महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- एलजेआर-१९२२/प्र.क्र.२५/२०२२/छाननी दिनांक- ०२ डिसेंबर, २०२२

# -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय- सहायक निबंधक भागिदारी संस्था, गट-ब (जाहिरात क्रमांक ०७५/२०२२) अनुभव प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत**

महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागांतर्गत सहायक निबंधक, भागीदारी संस्था, गट-ब या संवर्गातील ०३ पदांकरीता दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर जाहिरातीमधील परि. ८.२ अन्वये अनुभवाची अर्हता खालीलप्रमाणे आहे :-

(१) शासकीय विभाग, स्थानिक प्राधिकरण यामध्ये कायद्याचा अर्थ लावणे किंवा अधिनियमाचे प्रशासन या कामाचा किमान तीन वर्षे इतका प्रत्यक्ष अनुभव; किंवा

(२) उच्च न्यायालयामध्ये किंवा कोणत्याही दुय्यम न्यायालयामध्ये वकील म्हणून किमान तीन वर्षे इतका प्रत्यक्ष कामाचा अनुभव.

३. प्रस्तुत पदासाठी अर्ज केलेल्या बऱ्याच उमेदवारांनी वकील पदाचा अर्जात दावा केला असून त्यापृष्ठर्थ अनुभवाचा पुरावा म्हणून बार कौन्सील यांनी दिलेले प्रमाणपत्र/ खाजगी वकीलांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची प्रत सादर केली असून सदर प्रमाणपत्रे अनुभवाचा पुरावा म्हणून स्वीकारार्ह नाहीत. तसेच काही उमेदवारांनी उपरोक्त परिच्छेदातील अनुभवाच्या अर्हतेबाबत केलेल्या दाव्याच्या पृष्ठर्थ कोणतीही प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत.

४. उपरोक्त बाब विचारात घेता, प्रस्तुत पदासाठी अर्ज केलेल्या ज्या उमेदवारांनी वकील पदाचा अर्जात दावा केला आहे. त्यांनी उच्च न्यायालयामध्ये किंवा कोणत्याही दुय्यम न्यायालयामध्ये वकील म्हणून प्रत्यक्ष काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र संबंधित न्यायालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्रमाणित करुन विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत निवडप्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

५. उपरोक्त विषयांकित पदासाठी केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने अनुभव प्रमाणपत्र PDF करुन विहित आकारमानामध्ये आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ अंतर्गत ‘Certificate Upload’ या मेनूमध्ये दिनांक ०३ डिसेंबर,२०२२ रोजी १२.०० ते दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी २३:५९ या कालावधीत अपलोड करणे अनिवार्य राहिल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- मुंबई

उप सचिव, (सरळसेवा छाननी)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग